# वाघ इंजिनीअरिंगला 'एनबीए' मानांकन

## कॉम्प्युटर, केमिकलसह सहा विभागांचा समावेश

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाला नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रेडिटेशन, नवी दिल्ली (एनबीए) यांच्याकडून मानांकन प्राप्त झाले आहे. कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या सहा विभागांना हे मानांकन मिळाले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ते २०२७-२८ या तीन वर्षांसाठी हे मानांकन प्रदान करण्यात आले आहे.

नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रेडिटेशनच्या तेरा तज्ज्ञ सदस्यांनी ४ ते ६ एप्रिलदरम्यान महाविद्यालयाला भेट दिली. यावेळी प्राचार्य आणि सहाही विभागांचे विभागप्रमुख यांनी समितीसमोर सादरीकरण केले. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पुरवण्यात येणाऱ्या सुविधा, विविध उपक्रम, अध्ययन-अध्यापन पद्धती, प्रयोगशाळा, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट, क्रीडा, वसतिगृह आणि इतर सुविधा, प्राध्यापक यांचे निरीक्षण करून हे मानांकन देण्यात आले. यापूर्वी मेकॅनिकल विभागाला २०२४-२५ ते २०२६-२७ आणि 'एमसीए'ला २०२२-२३ ते २०२७-२८ पर्यंत मानांकन मिळाले आहे.